महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित,

# लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), पंचवटी, नाशिक

## मानसशास्त्र विभाग

## मराठी मानसशास्त्र परिषद (महाराष्ट्र राज्य)

यांच्या संयुक्त विद्यमाने

११ वे राष्ट्रीय व ३८ वे राज्यस्तरीय

# वार्षिक अधिवेशन

## सस्नेह निमंत्रण

**दि. २६ व २७ डिसेंबर, २०२५**

बीजविषय

## 'शाश्वत समाज विकासासाठी मानसशास्त्र'

**प्रमुख अतिथी व बीजभाषक**
मा. डॉ. अच्युत गोडबोले
ज्येष्ठ वैज्ञानिक, विचारवंत व लेखक

**उद्घाटक**
मा. डॉ. अपूर्वभाऊ हिरे
समन्वयक, महात्मा गांधी विद्यामंदिर

**संयोजक**
डॉ. डी. के. कन्नोर,
मानसशास्त्र विभाग प्रमुख

**स्वागताध्यक्ष**
प्राचार्य डॉ. बी.एस. जगदाळे
एल.व्ही.एच. महाविद्यालय (स्वायत्त), पंचवटी, नाशिक

**संयोजन सचिव**
डॉ. योगेश वानखेडे
९८८११६८५०९

**सहसंयोजक**
डॉ. प्रशांत सोनवणे
९७६६५६१५१३

**सहसंयोजक**
डॉ. जयमाला सोदे

# बीजविषय

# ‘शाश्वत समाज विकासासाठी मानसशास्त्र’

**उपविषय (Sub-themes) :**

१. कृत्रिम बुध्दिमत्ता आणि मानसशास्त्र : संधी व आव्हाने.
२. कृत्रिम बुध्दिमत्ता, मानसशास्त्र आणि समाज यांचा संगम.
३. ‘जेन-झी’ च्या समस्या व आव्हाने.
४. ‘जेन-झी’ (Gen. Z) : मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून सिंहावलोकन.
५. नैसर्गिक आपत्तीग्रस्तांचे मानसिक आरोग्य व कल्याणात्मक उपयोजन.
६. शाश्वत विकास : मानसशास्त्रीय दृष्टीकोन (Sustainable Development: Psychological Perspective)
७. भारतीय ज्ञानपरंपरेचे शाश्वत समाज विकासात योगदान.
८. आनंदी दीर्घायुष्यासाठी मानसिक व्यवस्थापन.
९. गुणवत्तापूर्ण जीवनाची मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून निर्मिती.
१०. आभासी वास्तवाचा मानसिक व भावनिकतेवरील परिणाम.
११. युवकांसमोरील मानसिक, भावनिक व सामाजिक आव्हाने.
१२. शाश्वत समाज विकासासाठी मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून प्रसारमाध्यमांची भूमिका व योगदान.
१३. बालमानस : बालकांच्या निकोप भावनिक, मानसिक विकासासाठी सक्षम पालकत्त्व.
१४. विद्यार्थी आत्महत्या : कारणमिमांसा व उपाययोजना.
१५. सुखकारक वृध्दत्व : कुटुंब व समाजाची नैतिक, मौलिक जबाबदारी.
१६. अशासकीय संस्थाचे (NGO) मानसिक आरोग्य संवर्धनात योगदान.
१७. आंतरवैयक्तिक नातेसंबंधांची जोपासना.
१८. एकविसाव्या शतकातील स्त्री : समस्या, आव्हाने व उपाययोजना.
१९. कार्यसमाधानास पूरक कार्यस्थळातील आवश्यक बदल.
२०. सुमधुर वैवाहिक व कौटुंबिक जीवन.
२१. आपत्कालीन परिस्थितीत मानसिक प्रथमोपचार. (Psychological First Aid)



MAHATMA GANDHI VIDYAMANDIR
BAHUJAN HITAAI BAHUJAN SUKHAAI
ESTABLISHED - 1952
Founder : Karmveer Bhausaheb Hiray



लोकनेते व्यंकटराव हिरे

कर्मवीर भाऊसाहेब हिरे

# आधारस्तंभ

मा. महिलारत्न श्रीमती पुष्पाताई हिरे, अध्यक्ष, महात्मा गांधी विद्यामंदिर

मा. डॉ. प्रशांतदादा हिरे, जनरल सेक्रेटरी, महात्मा गांधी विद्यामंदिर

मा. डॉ. स्मिताताई हिरे, खजिनदार, महात्मा गांधी विद्यामंदिर

मा. डॉ. हरिष पी. आडके, उपाध्यक्ष, महात्मा गांधी विद्यामंदिर

मा. डॉ. व्ही. एस. मोरे, सहसचिव, महात्मा गांधी विद्यामंदिर

## मराठी मानसशास्त्र परिषद : वार्षिक अधिवेशन २०२५

**लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), पंचवटी, नाशिक**

### मुख्य संयोजन समिती:

मा. डॉ. अपूर्वभाऊ हिरे, समन्वयक, महात्मा गांधी विद्यामंदिर
मा. डॉ. योगिताताई हिरे, अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती
प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे, विश्वस्त, महात्मा गांधी विद्यामंदिर
डॉ. व्ही.आर. निकम, उपप्राचार्य
डॉ. पी. जी. आंबेकर, उपप्राचार्य
डॉ. विष्णू आडोळे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक
डॉ. राकेश पाटील, शैक्षणिक पर्यवेक्षक, कला शाखा
डॉ. सतीश तांबे, शैक्षणिक पर्यवेक्षक, विज्ञान शाखा
डॉ. विनित रकीबे, शैक्षणिक पर्यवेक्षक, वाणिज्य शाखा
डॉ. डी. के. कन्नोर, मानसशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. योगेश वानखेडे, मानसशास्त्र विभाग
डॉ. प्रशांत सोनवणे, मानसशास्त्र विभाग
डॉ. जयमाला सोदे, मानसशास्त्र विभाग

# महात्मा गांधी विद्यामंदिर

'महात्मा गांधी विद्यामंदिर' संस्थेची स्थापना दूरदर्शी शिक्षणतज्ज्ञ आणि सहकारी चळवळीचे प्रवर्तक 'स्व. कर्मवीर भाऊसाहेब हिरे' यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी, २ ऑक्टोबर, १९५२ रोजी केली. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' ही व्यापक समाजकल्याणाची भावना असलेल्या या संस्थेचा सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा मूलभूत उद्देश होता. केवळ ग्रामीण, आदिवासी-दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाच नव्हे तर एकूणच समाजाला सर्वसमावेशक शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून हा शैक्षणिक कार्याचा यज्ञ कर्मविरांनी प्रज्ज्वलित केला.

महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेने सर्वच शाखांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि त्याचबरोबर मूल्यशिक्षणाचे बीज रूजविण्याचे ध्येय ठेवले. कर्मवीरांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत लोकनेते स्व. व्यंकटराव हिरे व महिलारत्न पुष्पाताई हिरे यांनी या संस्थेतील विद्याशाखांचा विकास घडवून आणला. संस्थेचे जनरल सेक्रेटरी समाजश्री प्रशांतदादा हिरे यांनी त्यात व्यावसायिक शिक्षण देणारी दंत, व्यवस्थापन, कायदा, आदरातिथ्य, फार्मसी, कृषी, फलोत्पादन महाविद्यालये आणि संबंधित संशोधन आणि विकास केंद्रे उभी करून विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या व्यावसायिक शिक्षणाची द्वारे खुले करून दिली. संस्थेचा हाच गौरवशाली वारसा पुढे नेत मा. डॉ. स्मिताताई हिरे (खजिनदार), संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्वभाऊ हिरे आणि विश्वस्त डॉ. अद्वयआबा हिरे-पाटील, विश्वस्त डॉ. संपदादीदी हिरे, मा. डॉ. योगिताताई हिरे (अध्यक्ष, कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी) यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली संस्थेने उत्कर्षाची अनेक शिखरे यशस्वीरित्या गाठली आहेत. महाराष्ट्रातील एक प्रसिध्द व नावलौकिकप्राप्त शैक्षणिक संस्था म्हणून शिक्षण क्षेत्रात या संस्थेने आपली छाप निर्माण केली आहे.

आज या संस्थेच्या छत्रछायेखाली ७ प्राथमिक विद्यालये, २९ माध्यमिक विद्यालये, १८ कनिष्ठ आणि १४ पारंपरिक वरिष्ठ महाविद्यालये, २ विधी, २ फार्मसी, ४ कृषी पदवी व पदविका, हॉटेल व्यवस्थापन महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, दंतवैद्यक महाविद्यालय, व्यवस्थापन महाविद्यालय, संगणक शास्त्र महाविद्यालय, संगीत महाविद्यालय, चित्रकला महाविद्यालय, अप्लाईड आर्ट महाविद्यालय, परफॉर्मिंग आर्ट महाविद्यालय, फॅशन डिझाईन महाविद्यालय, इंग्लिश मेडियम स्कुल, हॉस्पिटॅलिटी स्टडीज, अशा एकूण ९५ शाखा कार्यरत आहेत. पारंपरिक महाविद्यालयांमध्येही वेगवेगळे प्रमाणपत्र, डिप्लोमा आणि पदवी स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम राबवले जातात. ७० हजाराहून अधिक विद्यार्थी आणि जवळपास ३००० कर्मचारी आज या संस्थेच्या विविध शाखांच्या द्वारे शिक्षणासोबत संस्कार आणि सामाजिक बांधिलकीची विचारधारा पुढे नेत आहेत.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे साधन मानले. त्यांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे, तर माणसाचे चारित्र्य, आचरण आणि समाजसेवेची जाणीव जागवणारे माध्यम होय. त्यामुळेच संस्थेच्या प्रत्येक शाखेत श्रमदान, स्वच्छता मोहिमा, ग्रामविकास उपक्रम, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण आरोग्य या कार्यक्रमांना विशेष महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्यांना 'करून शिकणे' हा संस्कार दिला जातो. त्यांच्यात समाजाप्रती उत्तरदायित्त्वाची भावना जागवली जाते. त्यामुळे या संस्थेतून बाहेर पडलेले विद्यार्थी केवळ नोकरी करणारे नसून समाजाचे हितचिंतक बनून आपापल्या कायक्षेत्रात भरीव योगदान देतांना दिसतात.

## सल्लागार समिती:

डॉ. सी.जी. देशपांडे, ज्येष्ठ मानसशास्त्रज्ञ
प्रा. डी.एस. पवार, माजी विभागप्रमुख, म.स.गा. महाविद्यालय, मालेगांव
प्रा. डॉ. भास्कर शेजवळ, माजी विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
डॉ. हिंम्मतराव नरके, एम.जी.एम. विद्यापीठ, छ. संभाजीनगर
डॉ. पुंडलिक रसाळ, मा. प्राचार्य, सिन्नर महाविद्यालय, नाशिक
डॉ. व्ही. आर. शिंदे, माजी विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
डॉ. गौतम गवळी, अधिष्ठाता, मानव्यविद्यान, ॲमिटी विद्यापीठ
डॉ. राजेंद्र म्हस्के, मानसशास्त्र विभागप्रमुख, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
डॉ. अरुण बच्छाव, माजी मानसशास्त्र विभागप्रमुख, एल.व्ही.एच. कॉलेज, पंचवटी, नाशिक
डॉ. सी.ओ. बडगुजर, माजी मानसशास्त्र विभागप्रमुख, एच.पी.टी. कॉलेज, नाशिक.
प्राचार्य डॉ. मृणाल भारद्वाज, अध्यक्ष, मानसशास्त्र अभ्यासमंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
प्राचार्य डॉ. नरेंद्र देशमुख, पी.जी.एम. महाविद्यालय, लोनावळा
डॉ. सिताराम कोल्हे, सहा. पोलीस आयुक्त (से.नि.)
प्राचार्य डॉ. दिनेश नाईक, भोसला मिलिटरी कॉलेज, नाशिक
प्राचार्य डॉ. चंद्रमणी लभाणे, जळगांव
डॉ. अपर्णा अष्टपुत्रे, विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर
डॉ. दिगंबर दरेकर, मा. प्राचार्य, लोणावळा कॉलेज
डॉ. अभय शाळीग्राम, अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर
प्रा. एल. डी. देवरे, माजी विभागप्रमुख, जुन्नर कॉलेज
डॉ. अरविंद काकुळते, मानसशास्त्र विभागप्रमुख, एस.पी. कॉलेज, पुणे
प्रा. केशव गाडेकर, सी.टी. बोरा कॉलेज, शिरूर
डॉ. जयप्रकाश चोबे, माजी विभागप्रमुख, एस.जी. पाटील कॉलेज, साक्री
डॉ. अल्पना वैद्य, सिम्बॉयसीस कॉलेज, पुणे
डॉ. गोकुळ चौधरी, अभय महिला महाविद्यालय, धुळे
डॉ. सोपान बोराटे, कोटेचा महिला महाविद्यालय, भुसावळ
डॉ. शशिकांत खलाने, झेड. बी. पाटील कॉलेज, धुळे
डॉ. राजेश मेश्राम, जिजामाता कॉलेज, नंदूरबार
डॉ. शैलेन्द्र गायकवाड, संमोहन तज्ञ, नाशिक

# लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय




१९७१ मध्ये स्थापना झालेले 'लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), पंचवटी, नाशिक' हे नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य आणि प्रतिष्ठित महाविद्यालयांपैकी एक आहे. हे महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असून महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून स्वायत्त दर्जा प्राप्त केला आहे. समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हे महाविद्यालय अखंड समर्पित आहे.

महाविद्यालयाने अलीकडेच स्थापनेचे अर्थात ज्ञानदानाच्या या यज्ञाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे केले. महाविद्यालयाला NAAC कडून 3.27 CGPA सह "A+" श्रेणीचे पुनर्मूल्यांकन मानांकन प्राप्त झाले असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार देखील महाविद्यालयास प्राप्त झाला आहे.

महाविद्यालयात कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांमध्ये तसेच व्यवसायमुखी अभ्यासक्रमांमध्ये पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. स्तरापर्यंत विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना विविध पर्यायी विषय (Electives) निवडण्याची शैक्षणिक लवचिकता देखील नवीन शैक्षणिक धोरणामुळे तसेच महाविद्यालय स्वायत्त झाल्याने विद्यार्थ्यांना आता प्राप्त होत आहे.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी प्रगत, रोजगाराभिमूख आणि कौशल्याधारित शिक्षण दिले जाते. विशेष वैशिष्ट्यांमध्ये तीन वर्षांचे व्यावसायिक अभ्यासक्रम (B.Voc.), विविध अल्पकालीन प्रमाणपत्र (Certificate) आणि ॲड-ऑन अभ्यासक्रम यांचा समावेश आहे. सध्या महाविद्यालयात ४८ शैक्षणिक प्रोग्राम्स व १२ संशोधन केंद्रे (Research Centers) कार्यरत आहेत.

याशिवाय, महाविद्यालय मुक्त आणि दूरशिक्षण (Distance Learning) साठी SPPU, YCMOU आणि NPTEL Local Chapter यांच्या माध्यमातून विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातात.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांना राज्य सरकार, केंद्र सरकार आणि विद्यापीठाच्या सर्व शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात सक्षम करण्यासाठी स्पर्धा

परीक्षा केंद्र, करिअर मार्गदर्शन केंद्र आणि प्लेसमेंट सेल, सॉफ्ट स्कील्स प्रशिक्षण, समुपदेशन यांसारख्या विद्यार्थीकेंद्री योजना राबवल्या जातात. विद्यार्थ्यांच्या डिजिटल साक्षरतेसाठी मोफत संगणक प्रशिक्षण स्थानिक भाषेत उपलब्ध करून दिले जाते.

महिला विद्यार्थिनींसाठी सक्षमीकरणाच्या विशेष योजना राबवल्या जातात. 'अपूर्व दत्तक योजना' या माध्यमातून अनाथ विद्यार्थ्यांना आर्थिक आणि शैक्षणिक सहाय्य पुरवले जाते. विद्यार्थ्यांचे आरोग्य जोपासण्याच्या भावनेतून 'निरामय आरोग्य केंद्र' चालविले जाते.

महाविद्यालयातील सुसज्ज ग्रंथालयात ७० हजारांहून अधिक अभ्यासक्रमावर आधारित तसेच संदर्भ पुस्तके उपलब्ध आहेत. यासोबतच रिसर्च जर्नल्स, ई-संसाधनांचा (e-resources) समृद्ध साठा, व्हर्च्युअल लायब्ररी आणि शिक्षकांनी विकसित केलेले ई-कॉन्टेंट उपलब्ध आहे. DELNET, N-List इ. सुविधा देखील विद्यार्थी व अध्यापकांना ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

राष्ट्रप्रेम व समाजहिताची भावना निर्माण करणारे NCC आणि NSS हे विभाग सक्रियपणे कार्यरत आहेत. महाविद्यालयाचा क्रीडा विभाग देखील सुसज्ज असून, येथील विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तर, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडाप्रकारात सुवर्णपदके आणि विविध सन्मान प्राप्त केले आहेत. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक आणि अभ्यासेतर स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविलेला आहे.

महाविद्यालयात महिला विद्यार्थिनींच्या NCC सहभागाची समृद्ध परंपरा असून, महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थिनींनी प्रजासत्ताक दिन परेडमध्ये (RD Parade) सहभाग घेऊन महाविद्यालयाचा गौरव वृध्दिंगत केलेला आहे.

विद्यापीठ स्तरीय इनोफेस्ट स्पर्धा, आविष्कार स्पर्धा इ. संशोधनात्मक व नवनिर्मितीला चालना देणारे उपक्रम देखील महाविद्यालयात दरवर्षी आयोजित केले जात असतात. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नामांकित संस्था व आस्थापनांसोबत महाविद्यालयाने सामंजस्य करार (MOU) केलेले असून त्याद्वारे विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग सारख्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. महाविद्यालयात दरवर्षी विविध नाविन्यपूर्ण विषयांवर आधारित राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तराचे सेमिनार्स, वेबीनार्स, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जात असतात. समाजातील ज्वलंत विचारप्रवाह विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून अभिव्यक्त होण्यासाठी 'कर्मवीर भाऊसाहेब हिरे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा' महाविद्यालयात दरवर्षी आयोजित केली जाते.

# मराठी मानसशास्त्र परिषद : वार्षिक अधिवेशन २०२५

## सहयोगी सल्लागार समिती

डॉ. विलास कांबळे, मानसशास्त्र विभागप्रमुख, बिटको कॉलेज, नाशिकरोड
प्र. प्राचार्य, डॉ. समीर लिंबारे, एल.बी.आर.डी. महिला महाविद्यालय, नाशिकरोड, नाशिक
श्रीमती रूबी उनियाल, मानसशास्त्र विभागप्रमुख, के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक
डॉ. राजश्री कापुरे, मानसशास्त्र विभागप्रमुख, एच.पी.टी. कॉलेज, नाशिक
डॉ. ज्ञानेश्वर पवार, भोसला मिलिटरी कॉलेज, नाशिक
डॉ. जयश्री पाटील, व्ही.एन. नाईक कॉलेज, नाशिक
डॉ. संजय नवाळे, बेलापूर कॉलेज, ता. श्रीरामपूर
डॉ. शुभांगी गोसावी, के.एस.के.डब्ल्यू. कॉलेज, सिडको, नाशिक
डॉ. श्रध्दा रारावीकर, एस.व्ही.के.टी. कॉलेज, देवळाली कॅम्प, नाशिक
डॉ. सारिका क्षिरसागर, के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक
प्रा. विजय कमानकर, एम.व्ही.पी. समाज ओझर कॉलेज
डॉ. तनु शर्मा, सिल्व्हासा
डॉ. श्रीनिवास शिंदे, इंदापूर
डॉ. नागोराव डोंगरे, एस.पी.डी.एम. कॉलेज, शिरपूर
डॉ. मिलिंद बचुटे, आर.सी.पटेल कॉलेज, शिरपूर
डॉ. अरुण दैतकार, बीड
डॉ. सचिन जाधव, एस.एस.यु.पी.एस. कॉलेज, धुळे
डॉ. दिलीप शिवणे, नारायणगांव कॉलेज

## समन्वय समिती

(महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या विविध महाविद्यालयांतील मानसशास्त्र अध्यापक वर्ग)

डॉ. रमेश निकम, मानसशास्त्र विभागप्रमुख, एम.एस.जी. कॉलेज, मालेगांव
डॉ. बी. यु. पवार, निमगांव कॉलेज
डॉ. शांतीलाल शेवाळे, एम.एस.जी. कॉलेज, मालेगांव
प्रा. अनिल देवरे, एल.व्ही.एच. कॉलेज, नाशिक
प्रा. गोविंद पवार, एल.व्ही.एच. कॉलेज, नाशिक
डॉ. गणेश शेवाळे, एम.एस.जी. कॉलेज, मालेगांव
डॉ. कल्पेश कसबे, येवला कॉलेज
प्रा. रोहिणी पवार, एम.पी.एच. महिला कॉलेज, मालेगांव
प्रा. नम्रता पोफळे, एम.एस.जी. कॉलेज, मालेगांव
प्रा. पल्लवी शिरोळे, एम.एस.जी. कॉलेज, मालेगांव
प्रा. वैशाली वाघ, एम.पी.एच. महिला कॉलेज, मालेगांव
प्रा. रोशन गांगुर्डे, हरसुल कॉलेज

# लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

## मानसशास्त्र अभ्यासमंडळ, सन्माननिय सदस्य

डॉ. रविंद्र शिंदे, मानसशास्त्र विभागप्रमुख, विवेकानंद कॉलेज, छ. संभाजीनगर

डॉ. शशिकांत खलाने, झेड. बी. पाटील कॉलेज, धुळे

डॉ. मिनाक्षी गोखले, एस.पी. कॉलेज, पुणे

डॉ. बाळ राक्षसे, संचालक, टी.आय.एस.एस., तुळजापूर कॅम्पस

डॉ. अश्विनीकुमार भारद्वाज, सी.ई.ओ., बेजॉन देसाई फाऊंडेशन, नाशिक

प्रो. डॉ. प्रितमकुमार बेदरकर, बी.पी.एच.ई. कॉलेज, अहिल्यानगर

डॉ. विजयकुमार शिंदे, टी.सी. कॉलेज, बारामती

डॉ. एजाज शेख, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, पुणे

डॉ. गणेश लोखंडे, छ. शिवाजी कॉलेज, सातारा

## मराठी मानसशास्त्र परिषद : वार्षिक अधिवेशन २०२५

### समन्वय समिती

**लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयः**
**मानसशास्त्र विभाग**




डॉ. डी. के. कन्नोर (विभागप्रमुख)

डॉ. जयमाला सोदे

डॉ. योगेश वानखेडे

डॉ. प्रशांत सोनवणे

प्रा. सविता पिंगळे

प्रा. रुपाली खैरनार

प्रा. किंजल गोसावी

प्रा. हर्षाली खैरनार

प्रा. रोशन शिंदे

प्रा. गरिमा साळुंखे

श्री. सुभाष मांडवडे

# मानसशास्त्र विभाग

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग हा नाशिक जिल्ह्यात मानसशास्त्राची पदवी व पदव्युत्तर शिक्षण देण्याची मुहूर्तमेढ अर्थात प्रारंभ करणारा पहिलाच विभाग आहे. नाशिक व उत्तर महाराष्ट्र अशा पूर्वीच्या पुणे विद्यापीठाच्या व्यापक कार्यक्षेत्रात याच विभागाने मानसशास्त्र हा विषय ख-या अर्थाने अभ्यासकांमध्ये रुजविला. १९७६ मध्ये पदवी (बी.ए. मानसशास्त्र) व १९८९ मध्ये पदव्युत्तर (एम.ए. मानसशास्त्र) या अभ्यासक्रमांना सुरुवात झाली. या विभागाचे प्रथम विभागप्रमुख प्रा. सनत्कुमार भोरे यांच्यासारख्या अभ्यासू व्यक्तिमत्त्वाने या विभागाला सर्वदूर नावलौकिक प्राप्त करून दिला. त्यानंतर डॉ. डी.एस. पवार, डॉ. अरुण बच्छाव, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. मृणाल भारद्वाज यांनी या विभागाची धूरा यशस्वीपणे सांभाळून आपापल्या कार्यकाळात सर्वोत्तम अभ्यासपूर्ण योगदान देऊन विभागाचा मानसशास्त्राच्या दर्जात्मक शिक्षणाच्या बाबतीत महाविद्यालयाचा नावलौकिक मोठ्या उंचीवर नेऊन ठेवला. विभागाच्या कार्याचा देदीप्यमान वारसा सध्याचे विभागप्रमुख डॉ. डी. के. कन्नोर हे परिश्रमपूर्वक पुढे नेत आहेत. या विभागात सुरुवातीच्या काळात पदव्युत्तर वर्गाला औद्योगिक मानसशास्त्र हा विषय विशेष स्तरावर शिकविला जात होता. पुढे क्लिनिकल सायकॉलॉजी हा विषय देखील विशेष स्तरावर सुरु करण्यात आला.

'डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सायकॉलॉजी' हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेला कोर्स संपूर्ण महाराष्ट्रात केवळ याच महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागात १९८७-८८ पासून ते आजपर्यंत यशस्वीरित्या चालविता जातो. विषयाचा 'इंडस्ट्री कनेक्ट' या कोर्समुळे निर्माण होऊन विषयाची व्याप्ती व उपयोजन औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोहोचविण्यात आमचा मानसशास्त्र विभाग यशस्वी झाला आहे. याचप्रमाणे विद्यापिठ मान्यताप्राप्त 'सॉफ्ट स्कील्स डेव्हलपमेंट हा कोर्स' देखील चालविला जातो.

विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची मानसशास्त्रातील रुची बघून विज्ञान शाखेत देखील मानसशास्त्र विषय सुरु करण्यात आला. बी.एस्सी. सायकॉलॉजी स्पेशलायजेशन देणारे हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकमेव व महाराष्ट्रातील पहिलेच महाविद्यालय आहे.

येथील प्राध्यापकांनी यु.जी.सी. व इतर नामांकित संस्थांचे अनेक मेजर व मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्णत्त्वास नेले आहेत. तसेच पेटंट व कॉपीराईट देखील रजिस्टर केलेले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचे मानसशास्त्र विषयाचे रिसर्च सेंटर देखील येथे उपलब्ध आहे, ज्यामार्फत अनेक विद्यार्थ्यांनी आपले पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केले आहे.

मानसशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेत ४०० पेक्षा अधिक प्रमाणित मानसशास्त्रीय चाचण्या व प्रायोगिक उपकरणे उपलब्ध आहेत. तसेच विभागाच्या स्वतंत्र ग्रंथालयात ५०० पुस्तके, ३०० ई-बुक्स व अध्ययनसाहित्य संग्रहित केलेले आहे.

प्रतिष्ठित मानसोपचार तज्ञ, समुपदेशन केंद्रे व इतर आस्थापनांसोबत विभागाने सामंजस्य करार (M.O.U.) केलेले आहेत. ज्याद्वारे विद्यार्थ्यांना ऑन जॉब ट्रेनिंग, फिल्ड प्रोजेक्ट, इंटर्नशीप व प्लेसमेंट प्राप्त करून दिले जाते.

मानसिक आरोग्य जनजागृती, आत्महत्या प्रतिबंधात्मक प्रबोधन, मोफत समुपदेशन केंद्र अशी विविध समाज उपयोगी तसेच नेट, सेट व इतर स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन असे विद्यार्थीकेंद्री उपक्रम सातत्याने विभागातर्फे आयोजित केले जातात. अनेक नाविन्यपूर्ण विषयांवर राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे, चर्चासत्रांचे, वेबीनारचे आयोजन विभागातर्फे करण्यात आलेले आहे. विभागाचे असंख्य माजी विद्यार्थी अनेक महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक म्हणून तसेच इतर विविध ठिकाणी सन्मानाच्या पदांवर कार्यरत आहेत. माजी विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमांतील सहयोग ही या विभागाची जमेची बाजू राहिली आहे.



स्वागतास सज्ज..... मा. प्राचार्य डॉ. बी.एस. जगदाळे यांचे समवेत मानसशास्त्र विभाग

## कार्यकारी समिती-अध्यापक प्रतिनिधी, म.मा.प. अधिवेशन-२०२५

डॉ. संदिप माळी, पिंपळगांव कॉलेज; डॉ. संजय जाधव, एस.एम.बी.टी. हॉस्पिटल; डॉ. उमाकांत गायकवाड; प्रा. संदिप खिल्लारे, जुन्नर कॉलेज; प्रा. किशोर अंकुलणीकर, लासलगांव कॉलेज; प्रा. राजेंद्र कडाळे, लासलगांव कॉलेज; प्रा. बाळासाहेब वाघ, मखमलाबाद कॉलेज, नाशिक; डॉ. योगिता जाधव, त्र्यंबकेश्वर कॉलेज; प्रा. तन्मय जोशी, एच.पी.टी. कॉलेज, नाशिक; प्रा. मच्छिंद्र शेंडगे, सातपूर कॉलेज, नाशिक; प्रा. गणेश पानपाटील, सिल्व्हासा; प्रा. वैशाली शेजवळ, सोयगांव कॉलेज; प्रा. प्रकाश आव्हाड, निफाड कॉलेज; प्रा. वैशाली खालकर, सायखेडा कॉलेज, नाशिक; प्रा. निवेदिता अरसुळे, सिन्नर कॉलेज; प्रा. संदीप गायकवाड, खेडगांव कॉलेज; प्रा. विक्रम रसाळ, जुन्नर कॉलेज; प्रा. राजश्री बागुल, सिन्नर कॉलेज; प्रा. रमेश वाघमारे, जालना; डॉ. प्रफुल पवार, मुंबई विद्यापीठ; डॉ. ललिता निकम, एम.जे. कॉलेज, जळगांव; प्रा. सुवर्णा कटारनवरे; प्रा. काजल ढिकले; श्री. अजय ठाकरे; डॉ. सरिता आढळे; श्री. प्रमोद वाघ; अश्विनी केदारे; कोमल शिंदे; निमरा पठाण; इरफान खान

## कार्यकारी समिती-विद्यार्थी प्रतिनिधी, म.मा.प. अधिवेशन-२०२५

श्री. गौरव पगारे, डॉ. करुणा वानखडे-सोनवणे, सौ. नलिनी बागुल, श्री. मुकुल चौधरी, मुग्धा जोशी, सौ. शर्मिला भावसार, मयुर तांबे, सौ. रुपाली जाधव, सौ. सिमा वाघ, सौ. मनिषा सोनवणे, इन्शा जागीरदार, ऋतुजा माकवान, सुकन्या पाटील, साक्षी घोटेकर, शेरॉन शाबू, यश शिरसाठ, देविदास पाथरे, प्रार्थना वैद्य, कु. कनक शर्मा, स्वामिनी जुनागडे, वैभवी भोसले, ऋषीकेश राजगुरू, विजय काकडे, अर्णव परब, श्रृती करके, गायत्री पगार, विनिता चव्हाण, कल्याणी जाधव, आरती गांगुर्डे, शितल कांगणे, धनश्री जाधव, सविता नलावडे, मोनाली थोरात, आकाश मोरे, इशा खेडकर, पूजा सरनाईक, एकता ठाकरे, नेहा चंडालिया, स्वप्नील चौधरी, आरती गांगुर्डे, चार्मी शाह, श्रध्दा जाधव.

# मराठी मानसशास्त्र परिषद विद्यापीठ प्रतिनिधी

**मुंबई विद्यापीठ, मुंबई :** डॉ. क्रांती गवळी, डॉ. आर.बी. शिंत्रे

**एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई :** डॉ. मानसी राजहंस, डॉ. रमेश पठारे

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर :** डॉ. के.पी. निंबाळकर

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे :** डॉ. जयश्री पाटील, डॉ. एझाज शेख

**महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर :**
डॉ. हिम्मतराव नरके, डॉ. अमृता मगर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**
डॉ. अपर्णा अष्टपुत्रे-सिसोदे, डॉ. महेंद्र पाटील

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर :** डॉ. कल्पना पाटील, डॉ. विकास कांबळे

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**
डॉ. अरुणा तडसरे, डॉ. गजानन रत्नपारखी

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव**
डॉ. वैशाली पाटील, डॉ. शशिकांत खलाणे

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**
डॉ. नागोराव पाळवदे, डॉ. गणेश वायकोस

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर**
प्रा. अनंत कुलकर्णी, डॉ. अनिल मुंगुसकर

**गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली** : डॉ. लता चव्हाण

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक :** डॉ. नरेंद्र निकम

**एम.आय.टी. - पीस विद्यापीठ, पुणे :** डॉ. कौस्तुभ यादव

**कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा :** डॉ. गणेश लोखंडे

# ऐतिहासिक पुण्यभूमी ‘नाशिक’

‘नाशिक’ हे फक्त तीर्थक्षेत्र नाही, तर निसर्ग, संस्कृती, इतिहास असा पारंपरिक आणि आधुनिकतेचा सुरेख संगम असलेले शहर आहे. धार्मिक श्रध्दा, नैसर्गिक सौंदर्य, वाइन पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा यामुळे नाशिक महाराष्ट्रातील सर्वात आकर्षक पर्यटन स्थळांपैकी एक बनले आहे. महाराष्ट्राच्या उत्तर-पश्चिम भागात गोदावरी नदीच्या काठावर वसलेले हे शहर निसर्गसौंदर्य, प्राचीन धार्मिक स्थळे आणि औद्योगिक विकास यामुळे पर्यटक, भाविक, व्यावसायिक व नोकरदार वर्गासाठी आकर्षणाचे केंद्र होत आहे. रामायणकाळात भगवान श्रीराम, सीता आणि लक्ष्मण यांनी वनवासकाळात येथे काही काळ वास्तव्य केले होते, अशी पुराणकथा आहे. म्हणूनच नाशिक हे हिंदू धर्मातील एक प्रमुख तीर्थस्थान मानले जाते. पुढे पेशवाई आणि ब्रिटिश काळातही नाशिकचे व्यापारी आणि सांस्कृतिक महत्त्व वाढत गेले.

नाशिक हे कुंभमेळ्याचे एक प्रमुख स्थळ आहे. प्रत्येक १२ वर्षांनी येथे कुंभमेळा भरतो, ज्यात देश-विदेशातील लाखो भाविक गोदावरी नदीत स्नान करून धार्मिक विधी करतात. नाशिकचे हवामान आल्हाददायक आहे. येथे द्राक्षाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे येथे अनेक वायनरी उद्योगांची स्थापना झाली असल्याने नाशिकला ‘भारताची द्राक्षनगरी’ तसेच ‘भारताचे वाइन कॅपिटल’ म्हणून ओळखले जाते. सातपूर, अंबड आणि सिन्नर एम.आय.डी.सी. या औद्योगिक भागांमध्ये अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्या असल्याने औद्योगिक दृष्ट्या सुध्दा नाशिक महत्त्वाचे केंद्र झाले आहे. नाशिकला रस्तेमार्ग, रेल्वे आणि हवाई मार्गाने चांगला संपर्क आहे. येथील नागरिक संस्कारशील, धार्मिक आणि प्रगतिशील विचारांचे आहेत. स्वच्छता, शिस्त आणि सौंदर्य यामुळे नाशिक हे एक आकर्षक शहर आहे.

शैक्षणिक दृष्टीने देखील नाशिक शहराने मोठी उपलब्धी व प्रसिध्दी प्राप्त केली आहे. ‘महात्मा गांधी विद्यामंदिर’, ‘मराठा विद्याप्रसारक समाज संस्था’, ‘गोखले एज्युकेशन सोसायटी’, ‘के.के. वाघ शिक्षण संस्था’, ‘सी.एच.एम.ई. सोसायटी (भोसला कॉलेज)’, ‘के.व्ही.एन. नाईक एज्यु. संस्था’ या सारख्या प्रतिष्ठीत संस्थांनी येथे ज्ञानसाधनेचे मोठे कार्य केले आहे. याचसोबत ‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ’, ‘आरोग्य विज्ञान विद्यापीठ’, ‘सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकेंद्र’ व याचसोबत इतर खाजगी विद्यापीठ व संस्था यांमुळे नाशिक शैक्षणिक हब म्हणून नावारुपास आले आहे.

साहित्यक्षेत्रात देखील नाशिक शहराचा नावलौकिक सर्वदूर परिचित आहे. ‘ज्ञानपीठ पुरस्कार’ प्राप्त कुसुमाग्रज, प्रा. वसंत कानेटकर, बाबुराव बागुल यांसारख्या महान विभुतींनी आपल्या प्रगल्भ लेखनीच्या द्वारे नाशिकला साहित्य व सांस्कृतिक वैभव बहाल केले आहे.

**नाशिकमध्ये व जवळपास असलेली पर्यटन व आध्यात्मिक स्थळे :** पंचवटी परिसर, तपोवन, काळाराम मंदिर, सितागुंफा, रामकुंड परिसर, कपालेश्वर मंदिर, स्वामीनारायण मंदिर, गोदाघाट, रामशेज किल्ला, गंगापूर धरण बॅकवॉटर, पहिने, पांडवलेणी, फाळके स्मारक, सुला वाइनयार्डस्, सावरकर वाडा, खंडोबा टेकडी, सोमेश्वर धबधबा, चामारलेणी, त्र्यंबकेश्वर (ज्योतिर्लिंग मंदिर), सप्तशृंगी देवी मंदिर, अंजनेरी पर्वत, भास्करगड, मार्कंडेय किल्ला, धोडप किल्ला, कावनई, रतनगड, हरिश्चंद्रगड, राजधेर किल्ला, साल्हेर किल्ला, कश्यपी धरण, रांजनगड, चणकापूर धरण, सापुतारा, भंडारदरा, हतगड किल्ला, अंकाई-टंकाई, कळसूबाई ट्रेकिंग इ. अनेक पर्यटन व आध्यात्मिक स्थळे पर्यटनानंद प्रदान करतात.

## मराठी मानसशास्त्र परिषद

*मानसशास्त्र विषयक शास्त्रीय दृष्टीकोन, संशोधन, उपयोजनात्मक माहिती, नवनवे विचारप्रवाह, विषयातील नव्या संकल्पना इ. माहिती अभ्यासकांना, मानसशास्त्रात रूची असणा-या व्यक्तींना उपलब्ध करून देणे, मानसशास्त्राचा व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात अधिकाधिक उपयोग व्हावा, मानसशास्त्रज्ञांना त्यांच्या व्यावसायिक जीवनात सहाय्य करणे या उद्देशाने दि. ३१ जानेवारी, १९८८ रोजी मराठी मानसशास्त्र परिषदेची स्थापना झाली. पुणे येथे मुख्यालय असलेली 'मराठी मानसशास्त्र परिषद' ही महाराष्ट्र शासन अंतर्गत नोंदणीकृत संस्था आहे. (नोंदणी क्र. एफ.१३२९३३)*

## मराठी मानसशास्त्र परिषद कार्यकारिणी सदस्य

डॉ. मोहन निंबाळकर, अध्यक्ष - ९७६६४४४४६९
डॉ. रविंद्र शिंदे, उपाध्यक्ष - ९१५८४३९९९९
डॉ. कालिदास पाटील, सचिव - ९४२२७९१८७०
डॉ. प्रितमकुमार बेदरकर, सचिव - ९५२७५३८८९१
डॉ. नवनाथ सिंगापुरे, सहसचिव - ९४२२६११३०२
डॉ. शर्वरी दरेकर, खजिनदार - ९५२७५३८८९१

**शोधनिबंध सारांश / संपूर्ण स्वरूपात पाठविण्यासाठीच्या सूचनाः**

सदर अधिवेशनाच्या निमित्ताने मुख्य विषय आणि उपविषयाशी निगडीत अनुभवनिष्ठ (गुणात्मक आणि संख्यात्मक) तसेच सैध्दांतिक, उपयोजित सारांश / शोधनिबंध मागविण्यात येत आहेत.

१. वैयक्तिक माहितीच्या अनुषंगाने पुढील माहिती देणे आवश्यक आहेः नाव आणि वर्तमान पदनाम, संशोधनाचे शीर्षक, पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आणि भ्रमणध्वनी क्रमांक

२. संशोधन सारांश : संशोधन सारांश २५० शब्दांपर्यंत मर्यादित असावा. संशोधन सारांशामध्ये शोध निबंधाचा प्रकार, संशोधन शीर्षक, उद्दिष्टे, संशोधनपध्दती, निष्कर्ष, उपयुक्तता व मुख्य संज्ञा यांचा समावेश असावा.

३. संशोधन सारांशासाठी एम.एस.वर्ड २००३/२००७/२०१० इ. सॉफ्टवेअर मध्ये टाईप करून इंग्रजीकरिता टाईम्स न्यू रोमन (साईज १२) फॉन्टचा वापर करावा. आणि मराठी व हिंदीकरिता युनिकोड मंगल (साईज १६) फॉन्ट वापरावा. लाईन स्पेसींग १.५ ठेवावी.

४. विशेष सूचनाः निर्धारित वेळेत सादर करण्यात आलेले संशोधन सारांश प्रकाशित करण्याबाबत निवडीच्या निर्णयासाठी संशोधन समितीकडे पाठविले जातील. निवड झालेले शोधनिबंध / सारांश प्रकाशित केले जातील.

५. संशोधन सारांश पुढील ईमेलवर ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पाठवावेतः psy.dept.academic@gmail.com

लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय

# मराठी मानसशास्त्र परिषद
## वार्षिक अधिवेशन २०२५

पंचवटी, नाशिक

मानसशास्त्र विषयावर प्रेम असणा-या सर्व अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक, समूपदेशक, मानसशास्त्रज्ञ, मानसोपचारतज्ञ, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रांतील व्यावसायिक बांधवांना नम्र निवेदन करण्यात येते की, मानसशास्त्र परिषदेच्या यावर्षीच्या अधिवेशनात आपण सहभाग नोंदवावा आणि या परिषदेच्या निमित्ताने होणा-या अभ्यासपूर्ण व संशोधनात्मक चर्चासत्रांचा, मान्यवरांच्या मार्गदर्शनाचा, समाजजीवनातील मानसिक, भावनिक अशा ज्वलंत समस्यांवर होणा-या विचारमंथनाचा ज्ञानसंपादनाच्या हेतूने अवश्य लाभ घ्यावा, अशी आयोजकांच्या वतीने सस्नेह विनंती.

**नोंदणी करण्याची अंतिम तारीखः १० डिसेंबर, २०२५**

(सदर तारखेपर्यंत नोंदणी केलेल्या बाहेरगांवच्या सहभागी व्यक्तींची दि. २६ डिसेंबर रोजीची एक दिवसाची निवास व्यवस्था केली जाईल. त्यानंतर अथवा ऐनवळी नोंदणी करणा-या व्यक्तींना केवळ नाशिकमधील उपलब्ध निवास व्यवस्थांची माहिती दिली जाईल. तथापि वर्षअखेर व सुट्टीचा कालावधी असल्याने निवासाची खात्री देता येणार नाही, याची कृपया सहभागी व्यक्तींनी नोंद घ्यावी.)

**नोंदणी शुल्कः**

१. संशोधक विद्यार्थी रु. ११००/- (बाहेरगांवच्या संशोधक विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्थेसह)

२. प्राध्यापक रु. २२००/- (निवास व्यवस्थेशिवाय)

३. प्राध्यापक रु. २५००/- (निवास व्यवस्थेसह)

कृपया वरील क्यु.आर. कोडद्वारे गुगलफॉर्म भरून अधिवेशन सहभागाची नोंदणी करावी.

अधिवेशनाचे शूल्क जमा करण्यासाठी :

फोन पे नंबर : 9823858791 (D. K. Kannor)

Design & Print : Sanyog Publication - 8830638488